


दैनिक
अचूक वेध, अचूक बातमी

# अक्षराज

संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध
Email : newsaksharaj2021@gmail.com

खालील (क्यू आर कोड) स्कॅन करा...
आणि अक्षराज मीडियाच्या व्हाट्सअप चॅनल ला फॉलो करा व मिळवा सर्व घडामोडींचे अपडेट्स एकाच वेळी एकाच ठिकाणी...
कृपया इथे स्कॅन करा
Plz Scan Here

वर्ष : ०६ | अंक : ५२, पाने : ०४, किंमत : ०३ रुपये | बुलडाणा, सोमवार, दि.०५ ऑक्टोबर २०२६ | संपादक : विनोद कैलास गोरे | RNI NO. : MAHMAR/2022/82056

# मुंबईतील ठाकरेंच्या मोर्चाला तुफान गर्दी; राज ठाकरे निवडणूक आयोगासह भाजपवर बरसले

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.०४, मुंबई :** निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी मुंबईत शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे आणि मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांच्या नेतृत्वात काढण्यात आलेल्या मोर्चाला नागरिकांचा मोठा प्रतिसाद मिळाला. मेट्रो सिनेमापासून सुरू झालेल्या या मोर्चाचं रुपांतर मुंबई महानगरपालिका परिसरात जाहीर सभेत झालं. यावेळी बोलताना राज ठाकरे यांनी निवडणूक आयोगासह सत्ताधारी भाजपचा जोरदार समाचार घेतला आहे. एसआयआर प्रक्रिया रद्द करण्यासह निवडणुका पुन्हा ईव्हीएम वरून बॅलेट पेपरवर घेण्यात आल्या पाहिजेत, अशा प्रमुख मागण्या राज ठाकरे यांच्याकडून करण्यात आल्या आहेत.



राज ठाकरे यांनी म्हटलं की, देशातील तर होईलच, पण महाराष्ट्रात आतापर्यंत जी एसआयआर प्रक्रिया झाली आहे ती रद्द झाली पाहिजे. एसआयआरचं जे प्रकरण आता देशभरात सुरू आहे ते बेकायदेशीर आहे. एसआयआरमधून महाराष्ट्रातील दोन कोटी मतदार बाहेर काढले आहेत, हे कोण आहेत दोन कोटी लोक? म्हणून माझी सर्व राजकीय पक्षांना विनंती आहे की, दिल्लीत हा विषय मांडताना एसआयआर रद्द करणे आणि व्होटिंग मशीन बंद होऊन बॅलेट पेपरवर मतदान झालं पाहिजे, या आपल्या मागण्या हव्यात. या दोन गोष्टी झाल्या तर 'दूध का दूध, पानी का पानी' होईल. उद्या कोणाचीही सत्ता येवो, काहीही फरक पडत नाही. पण ती सत्ता योग्य मार्गाने यावी, अशी अपेक्षा राज यांनी व्यक्त केली आहे.

**ठाकरी शैलीत समाचार !**

मुंबईत वातावरण तापलंय ते उन्हामुळे आणि देशात वातावरण तापलंय ते मतचोरीमुळे. २०१७ पासून मी सांगतोय की यामध्ये चोऱ्या केल्या जात आहेत. तेव्हापासून मी विविध नेत्यांना भेटून सांगत होतो की, निवडणूक आयोगापासून ईव्हीएमपर्यंत या गोष्टींमध्ये घोळ सुरू आहे, आपण यावर पाऊल उचललं पाहिजे. निवडणुकीवर बहिष्कार टाका, असं आवाहन मी केलं होतं, कारण त्याशिवाय सत्य समोर येणार नाही. २०२४ च्या विधानसभा निवडणुकीत भाजप आणि शिंदेंच्या शिवसेनेला बहुमत मिळालं, पण संपूर्ण महाराष्ट्रात सन्नाटा होता. हा कसला विजय आहे? लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीच्या दरम्यान ४० ते ६० लाख मतदार वाढवले गेले. असा कुठला वायग्रा आला की अचानक एवढे मतदार वाढले, असा हल्लाबोलही राज ठाकरेंनी केला आहे.

**भाजपवर निशाणा !**

आपल्या भाषणात पुढे बोलताना राज ठाकरे म्हणाले की, सत्ताधारी लोकांना मला एवढंच सांगायचंय की, तुम्ही सत्तेवर बसलाय याची आम्ही असूया नाही, पण ती सत्ता तुम्ही ज्या पद्धतीने राबवताय त्याचा आम्हाला राग आहे. कोणाला सत्तेवर बसवायचं हे या देशातील लोकांनी ठरवावं, निवडणूक आयोगाने नाही. सध्या मनमानी कारभार सुरू आहे. एकाच उद्योगपतीला जंगलं देऊन टाकायची, एकाच उद्योगपतीला विमानतळ देऊन टाकायची, त्याला पोर्ट देऊन टाकायचे. ही गोष्ट येथे कुठून? हे निवडणूक आयोगाला बांधल्याशिवाय येऊ शकत नाही. निवडणूक आयोग आमच्यासोबत असेल तर आम्ही कसेही वागू, असं सत्ताधाऱ्यांचं मत आहे, असा आरोप राज ठाकरे यांनी केला आहे.

**उद्या तुम्हाला रस्त्यावर फिरणं मुश्किल होईल, ठाकरेंचा इशारा**

आज कुठेही गेलं, निदान आम्हाला मत देण्याची चोरी नव्हती. आज मत चोरी करायला लागले आहेत, मतदानाचा अधिकार सुद्धा हे काढून घेत आहेत. पण त्यांना अजून लक्षात आलेलं नाही. न्यायसंस्था तुम्ही ताब्यात घेतली असेल, प्रशासन ताब्यात घेतलं असेल, आणखी काही संस्था तुम्ही ताब्यात घेतल्या असतील. पण हे रस्ते जनतेच्या मालकीचे आहेत. या रस्त्यांवर उद्या तुम्हाला फिरणं मुश्किल होऊन जाईल. या उद्या रस्त्यावर, असा इशारा उद्धव ठाकरे यांनी दिला.

**उद्धव ठाकरेंची पंतप्रधानांवर टीका**

तुमचा एवढा मोठा पक्ष आहे आणि तुम्ही एवढं काम केलं आहे, एवढ्या बहुमताने तुम्ही निवडून येत आहेत तर संपूर्ण देशात आजपर्यंत कधीही घडलं नाही, जे काँग्रेस काळात घडलं नाही, ते भाजपने करुन दाखवलं. आजपर्यंत जेवढ्या शिव्या कधीही पंतप्रधानांना पडल्या नव्हत्या, तेवढ्या शिव्या पहिले प्रथम आजच्या पंतप्रधानांना पडत आहेत. एक काळ जरुर असा होता की, लोकांना ह्यांच्याविरोधात बोलताना भीती वाटायची. आता लोकांना भीती जरुर वाटते, पण ती ह्यांच्या बाजूने बोलण्याची भीती वाटते, अशी टीका उद्धव ठाकरेंनी केली.

## गडचिरोली-चिमूर लोकसभा क्षेत्रातील कृषी पंपांना २४ तास वीजपुरवठा द्या : खा.डॉ.नामदेव किरसान

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.०४, चंद्रपूर :** यावर्षी राज्यातील अनेक भागांमध्ये अपेक्षेप्रमाणे पाऊस न झाल्याने दुष्काळसदृश परिस्थिती निर्माण झाली असून, त्याचा मोठा फटका शेतकऱ्यांना बसत आहे. गडचिरोली-चिमूर लोकसभा क्षेत्रातील बहुतांश शेतकरी धान पिकावर अवलंबून असून, अपुऱ्या पर्जन्यमानामुळे पिकांना सिंचनाची आवश्यकता निर्माण झाली आहे. मात्र, कृषी पंपांसाठी होणारा अनियमित व अपुरा वीजपुरवठा यामुळे शेतकऱ्यांना सिंचन करताना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे.

या पार्श्वभूमीवर गडचिरोली-चिमूर लोकसभा क्षेत्रातील कृषी पंपांना २४ तास अखंडित वीजपुरवठा उपलब्ध करून देण्यात यावा, अशी मागणी खासदार डॉ. नामदेव किरसान यांनी मुख्यमंत्री मा. देवेंद्रजी फडणवीस यांच्याकडे पत्राद्वारे केली आहे.

गडचिरोली-चिमूर लोकसभा क्षेत्रातील अनेक शेतकरी धान पिकाची शेती करतात. धान पिकासाठी मोठ्या प्रमाणात पाण्याची आवश्यकता असते. ज्या भागांमध्ये सिंचनाच्या सुविधा उपलब्ध आहेत, त्या ठिकाणी अल्प पर्जन्यमानाच्या परिस्थितीत या सुविधांचा प्रभावी वापर करून पिकांना आवश्यक पाणी देणे शक्य आहे. मात्र, कृषी पंपांना पुरेसा व नियमित वीजपुरवठा उपलब्ध नसल्याने सिंचन व्यवस्था असूनही त्याचा अपेक्षित लाभ शेतकऱ्यांना घेता येत नाही.



सध्या पिकांच्या वाढीच्या महत्त्वाच्या टप्प्यात पाण्याची आवश्यकता असून, वेळेवर सिंचन न झाल्यास शेतकऱ्यांच्या हातात आलेले पीक वाया जाण्याची शक्यता आहे. त्यामुळे शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान टाळण्यासाठी कृषी पंपांना नियमित व अखंडित वीजपुरवठा उपलब्ध करून देणे अत्यंत आवश्यक असल्याचे खासदार डॉ. नामदेव किरसान यांनी पत्रात नमूद केले आहे.

अल्प पर्जन्यमानामुळे निमर्ण झालेल्या परिस्थितीचा गांभीर्याने विचार करून गडचिरोली-चिमूर लोकसभा क्षेत्रातील कृषी पंपांना २४ तास वीजपुरवठा उपलब्ध करून देण्याबाबत संबंधित विभागाला तातडीने निर्देश द्यावेत, अशी मागणी खासदार डॉ. नामदेव किरसान यांनी केली आहे. यामुळे उपलब्ध सिंचन सुविधांचा पूर्ण क्षमतेने वापर करून शेतकऱ्यांना पिकांना आवश्यक पाणी देता येईल आणि दुष्काळसदृश परिस्थितीत पिके वाचविण्यास मोठी मदत होईल.

शेतकऱ्यांच्या हिताचा विचार करून या मागणीवर तातडीने सकारात्मक निर्णय घेऊन आवश्यक कार्यवाही करण्यात यावी, अशी विनंती खासदार डॉ. नामदेव किरसान यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली आहे.

## पैठणच्या रस्ता अपघात प्रकरणी आरोपीला जामीन नाकारला

**अक्षराज : प्रतिनिधी**



**दि.०४, छ. संभाजीनगर :** संत एकनाथ साखर कारखान्याचे संचालक कै. भाऊसाहेब पिसे यांच्या मृत्यूस कारणीभूत ठरलेल्या आरोपीला सर्वोच्च न्यायालयाने जामीन नामंजूर केला आहे. ३ ऑक्टोबर २०२५ रोजी रात्री पैठण-छत्रपती संभाजीनगर मार्गावर हा अपघात झाला होता. रस्ता ओलांडणाऱ्या दुचाकीला भरधाव वेगात असलेल्या चारचाकी वाहनाने धडक दिली. यात दुचाकीस्वार भाऊसाहेब पिसे व मागे बसलेल्या कर्डिले या शिक्षकाचा जागीच मृत्यू झाला होता. याबाबत पैठण पोलिसांनी अभिषेक धस याच्यावर गुन्हा दाखल करून अटक केली होती. दरम्यान, याप्रकरणी नवी दिल्ली येथे दाखल करण्यात आलेल्या विशेष अनुमति याचिकेवर सुनावणी झाली. या प्रकरणाची सुनावणी १ ऑक्टोबर २०२६ रोजी न्यायमूर्ती सतीश चंद्र शर्मा व मा. न्यायमूर्ती नोंग्मेइकापम कोटिश्वर सिंग यांच्या खंडपीठासमोर झाली. आरोपी अभिषेक धस याच्या जामिनासंदर्भातील सर्वोच्च न्यायालयातील ही कारवाई १ ऑक्टोबर रोजी निकाली काढण्यात आली.

## पुण्याच्या राजकारणात ट्विस्ट, देवेंद्र फडणवीस यांचं गावडेंना समर्थन

**अक्षराज : प्रतिनिधी**



**दि.०४, पुणे :** विधान परिषदेच्या पुणे शिक्षक मतदारसंघाच्या उमेदवारीवरुन महायुतीमधील मतभेद चव्हाट्यावर आले आहेत. भाजपकडून या जागेवर पारंपरिक जागा म्हणून दावा केला जात होता. तर दुसरीकडे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेकडूनही या जागेवर दावा सांगितला जात होता. एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेचे नेते मंगशे चिवटे हे येत्या मंगळवारी शिवसेनेच्यावतीने उमेदवारी अर्ज दाखल करणार असल्याचं त्यांनी जाहीर केलं आहे. दुसरीकडे भाजपने अधिकृतपणे पुणे शिक्षक मतदारसंघासाठी कौस्तुभ गावडे यांना उमेदवारी जाहीर केली आहे. त्यांच्या उमेदवारीला देवेंद्र फडणवीस यांचं समर्थन आहे. त्यामुळे आता मंगेश चिवटे काय भूमिका घेतात? ते पाहणं महत्त्वाचं आहे.

**देवेंद्र फडणवीस काय म्हणाले?**

विधान परिषदेच्या निवडणुकीसाठी भारतीय जनता पक्षाने तीन जागांसाठी उमेदवार घोषित केले आहेत. अतिशय सक्षम उमेदवार घोषित केले आहेत. त्यामुळे आम्हाला विश्वास आहे की, या तीनही जागा आम्ही जिंकू आणि उर्वरित दोन जागांवर आमचे मित्रपक्ष लढतील आणि तेही जिंकतील, अशी भूमिका देवेंद्र फडणवीस यांनी मांडली.

**बंडखोरांची मनधरणी केली जाईल?**

यावेळी पत्रकारांनी बंडखोरी करणाऱ्यांची मनधरणी करणार का? असा प्रश्न विचारला. त्यावर त्यांनी शेवटी पक्षातून ज्याला तिकीट मिळालं आहे त्याने लढलं पाहिजे. ज्यांना तिकीट मिळालं नाही त्यांनी माघार घेतली पाहिजे. जर कुणी बंडखोरी करणार असेल तर आम्ही त्यांच्याशी चर्चा निश्चित करु, अशी प्रतिक्रिया दिली.

स्मिता जाधव यांचा पक्षप्रवेश चांगली गोष्ट आहे. पुणे पदवीधर मतदारसंघात अतिशय चांगल्या उमेदवार म्हणून स्मिता जाधव यांच्याकडे आपल्याला पाहता येईल. मला निश्चित विश्वास आहे की, त्यांना लोकं निवडून देतील. तसेच कौस्तुभ गावडे हे शिक्षकांमध्ये आणि शिक्षण क्षेत्रात खूप चांगल्या पद्धतीने काम करत आहेत. विशेषत: विविध संस्थांच्या माध्यमातून त्यांचे कार्य अत्यंत चांगलं आहे. ते पुणे शिक्षक मतदारसंघाचे उमेदवार आहेत, असं देवेंद्र फडणवीस म्हणाले.

## चारठाणा येथे मोतीबिंदू पूर्वतपासणी आरोग्य शिबिर संपन्न

**अक्षराज : अलीम शेख**

**दि.०४, चारठाणा (परभणी) :** "NCD-TB-Cataract मुक्त परभणी' अभियानांतर्गत शनिवार, दिनांक ३ ऑक्टोबर २०२६ रोजी चारठाणा येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात मोतीबिंदू पूर्वतपासणी आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले. राज्यमंत्री तथा परभणी जिल्ह्याच्या पालकमंत्री ना. मेघना साकोरे बोर्डीकर यांच्या मार्गदर्शनाखाली, जिल्हा परिषद परभणीचे मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा आरोग्य अधिकारी व जिल्हा शल्यचिकित्सक यांच्या मार्गदर्शनाखाली हे शिबिर संपन्न झाले.



या शिबिराचे उद्घाटन गोविंदभाऊ थिटे, नानासाहेब राऊत, शिवाजीराव कदम, पंचायत समिती सदस्य तहेसीन देशमुख आणि तालुका आरोग्य अधिकारी डॉ. बाबासाहेब जाधव यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. सकाळी १० वाजता प्राथमिक आरोग्य केंद्र चारठाणा येथे शिबिराला सुरुवात झाली. या शिबिरामध्ये मोतीबिंदूचा संशय असलेल्या एकूण १३८ रुग्णांची पूर्वतपासणी करण्यात आली. त्यापैकी ३८ रुग्ण मोतीबिंदू शस्त्रक्रियेसाठी पात्र आढळून आले. त्यामुळे परिसरातील गरजू रुग्णांना वेळेत निदान व पुढील उपचारांची संधी उपलब्ध झाली आहे.

या शिबिरामुळे ग्रामीण भागातील नागरिकांना मोतीबिंदूच्या आजाराबाबत जागरूकता निर्माण होण्यास मदत झाली. अनेकदा आर्थिक अडचणी, आरोग्यविषयक माहितीचा अभाव आणि दवाखान्यापर्यंत पोहोचण्यातील अडचणींमुळे नागरिक डोळ्यांच्या आजारांकडे दुर्लक्ष करतात. अशा परिस्थितीत आरोग्य विभागाच्या वतीने आयोजित करण्यात आलेली ही शिबिरे नागरिकांसाठी महत्त्वपूर्ण ठरत आहेत. या वेळी डॉ. राजकुमार पोकर्णा, वाजेद कुरेशी, भाऊराव भवरे, शिवशंकर तमशेटे, विशाल निकाळजे, श्रीपाद देशपांडे, साबेर पठाण, बाबासाहेब हेंद्रे, संदीप देशमुख, पूनमताई तमशेटे, तुषार तोडकर, रामराव देशमुख, अमोल भवरे, आनंद निकाळजे, तलाठी प्रवीण बुरकुल, अन्वर पठाण आणि चिंतामण दौंड यांच्यासह आरोग्य विभागातील अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**आरोग्य कर्मचाऱ्यांच्या सहकार्याने शिबिर यशस्वी**

शिबिर यशस्वी करण्यासाठी तालुका आरोग्य अधिकारी डॉ. आबासाहेब जाधव, नेत्ररोग तंत्रज्ञ डॉ. काळे (परभणी), तालुका आरोग्य सहाय्यक राठोड, तालुका कार्यक्रम सहाय्यक दत्तात्रय कौटकर, ढगे, मीरा देशमुख तसेच प्राथमिक आरोग्य केंद्र चारठाणाचे वैद्यकीय अधिकारी डॉ. विश्वनाथ गळाकाटू यांनी विशेष परिश्रम घेतले.




## अभिनेत्री संध्या

आजच्या टेक्नोसॅव्ही युगात मोबाईल, आयफोन, टॅब्लेट, कॉम्प्युटर, लॅपटॉप ही उपकरणे वापरणाऱ्या कोणत्याही व्यक्तीला स्टीव्ह जॉब्स हे नाव माहीत नसेल हे अशक्यच आहे. स्टीव्ह जॉब्स ज्याने ऍपल ही कंपनी सुरू केली आणि ती आज जगातील सर्वात यशस्वी कंपनी बनवली, त्याच ऍपल कंपनीचा संस्थापक, तंत्रज्ञानाचा बादशहा स्टीव्ह जॉब्स यांचा आज स्मृतिदिन.

स्टीव्ह जॉब्स यांचा जन्म २४ फेब्रुवारी १९५५ रोजी अमेरिकेतील ग्रीन बे या गावी झाला. सिरियाचा मुस्लिम विद्यार्थी अब्दुल फतेह व जोहान शिबिल यांनी विवाहाआधी जन्मलेले मूल एका अनाथालयाला दिले. तेथून पॉल - क्लारा जॉब्स या आर्मेनियन कुटुंबाने त्याला दत्तक घेतले. दत्तक घेताना या कुटुंबाने या मुलाला पदवी पर्यंतचे शिक्षण देईल आणि सुखात ठेवेल असे वचन दिले; पण जॉब्स दांपत्य गरीब असून ते मजुरी करत आहेत, हे समजल्यावर स्टीव्हच्या मातापित्यांनी त्यावर आक्षेप घेतला. सहा महिन्यांच्या चर्चेनंतर ते स्टीव्हला जॉब्स दांपत्याला दत्तक द्यायला तयार झाले. स्वतः गरीब असून, मोलम जुरी करूनही जॉब्स दांपत्याने दिलेले वचन पूर्ण केले. लहानपणी स्टीव्ह एकलकोंडा होता. आपण कोणालाच नको आहोत, अशी त्याची भावना बनली होती. हायस्कूलमध्ये असताना स्टीव्हला ह्युलेट पॅकर्ड या कारखान्यात काम करण्याची संधी मिळाली. जिथे त्याची स्टीव्ह व्होजनियाकसोबत ओळख झाली. तेंव्हा स्टीव्ह जॉब्स १६ वर्षाचा तर स्टीव्ह व्होजनियाक २१ वर्षाचा होता. दोघांची मैत्री होण्याचे कारण म्हणजे दोघांना तंत्रज्ञानाची आवड होती. व्होजनियाकने व्हिडिओ गेमचा टेलिटाईप व मायक्रोप्रोसेसर बनवला होता. स्टीव्ह जॉब्सला त्याच्यावर खूप विश्वास होता. १९७० नंतर कॉम्प्युटर क्षेत्रात नवनवे बदल व प्रयोग होत होते. नवनिर्मितीचा ध्यास असणाऱ्या स्टीव्ह जॉब्स यांनी ही संधी साधून १९७६ मध्ये व्होजनियाकवर कॉम्प्युटर निर्मितीची जबाबदारी सोपवली आणि स्वतः मार्केटमध्ये लक्ष घातले. कॉम्प्युटर तयार झाला. कंपनी देखील बनली. कंपनी रजिस्टर करायची पण कोणत्या नावाने हा प्रश्न होता. अनेक नावे समोर आली पण ती स्टीव्हला पसंत पडली नाही. त्याच्या घरासमोर सफरचंदाचे झाड होते. एका सकाळी त्याने झाडाचे सफरचंद तोडून खायला सुरवात केली आणि त्याला कंपनीचे नाव सुचले ऍपल. पुढे याच नावाने कंपनी रजिस्टर झाली. त्यांना लगेच ५० कॉम्प्युटरची ऑर्डरही मिळाली. अशा प्रकारे वयाच्या २१ व्या वर्षीच कॉम्प्युटर क्षेत्रात शिरला आणि एका कंपनीचा मालक बनला. त्याच्याकडे तंत्रज्ञानाची पदवी नव्हती ; पण कल्पना होत्या. मॅनेजमेंटचे कौशल्य होते. त्याने तंत्रज्ञानात तरबेज असणारी माणसे निवडली. बाजारपेठेच्या गरजेची नस पकडत त्याने एकापेक्षा एक अत्याधुनिक आणि सरस उत्पादने धुमधडाक्यात उतरवली. त्याने बाजारपेठेत आणलेल्या ऍपल १ पीसी या पर्सनल कॉम्प्युटरला खूप मागणी होती. कंपनी चालवताना स्टीव्ह ने अनेक धडाकेबाज निर्णय घेतले; पण हे करताना त्याने अनेकांची मने दुखावली. त्यामुळे सहकाऱ्यांशी त्याचे मतभेद वाढले. शेवटी त्याने आपणच स्थापन केलेली ऍपल कंपनी सोडली. १९८६ मध्ये त्याने चित्रपट दिग्दर्शक जॉर्ज लुकास सोबत भागीदारी करून एक कंपनी स्थापन केली. त्या कंपनीचे नाव पिक्सार असे होते. या कंपनीने ऍनिमेशन सिनेमे बनवले. ते खूप गाजले. या कंपनीने वॉल्ट डिस्ने सोबत करार केल्याने या कंपनीने खूप पैसे कमावले. इकडे स्टीव्ह जॉब्स सोडून गेल्यापासून ऍपल कंपनी मात्र तोट्यात आली. आयबीएम, मायक्रोसॉफ्ट या कंपन्यांपुढे ऍपलचा निभाव लागत नव्हता. अखेर १९९७ ला स्टीव्ह जॉब्स पुन्हा ऍपलमध्ये परतले. आपल्या कल्पक बुद्धीने त्यांनी ऍपलला पुन्हा अव्वल स्थानी पोहचवले. आयबीएम, मायक्रोसॉफ्ट या कंपन्यांनी कॉम्प्युटरमध्ये मक्तेदारी सिद्ध केल्याने काही तरी नवे करण्याची उर्मी स्टीव्हला आली त्यातूनच त्याने आयफोन, आयपॉड, आयपॅड बाजारात सादर केले. त्यांच्या या दुरदर्शीपणाला जगाने सलाम केला. २००१ मध्ये ऍपलने ५ गिगाबाईट क्षमतेचा आयपॉड तयार केला. हा सर्वात लहान म्युजिक प्लेयर होता. त्यात एक हजार गाणी स्टोअर करता येत. हा आयपॉड अल्पावधीतच लोकप्रिय झाला. या आयपॉडने वॉकमनला कायमचे घरी बसवले. २००७ मध्ये ऍपलने टचस्क्रीन मोबाईल मार्केटमध्ये आणला. टचस्क्रीन आणि अतिशय सोप्या इंटरफेसमुळे तो खूप लोकप्रिय झाला. थ्री जी मोबाईल देखील ऍपलनेच सर्वप्रथम सर्वात आधी मार्केटमध्ये आणला. २०१० मध्ये आलेल्या पहिल्या टॅबलेट पीसीने जगभरातील गॅजेट प्रेमींना वेड लावले. सतत नवीन काहीतरी करून तंत्रज्ञानात आपले वर्चस्व निर्माण करणाऱ्या स्टीव्ह जॉब्स यांना भारताविषयी खूप प्रेम होते. ते अनेकदा भारतात येऊन गेले. भारतातील अध्यात्म आणि बौद्ध धर्माविषयी त्यांना खूप कुतूहल होते. नवनिर्मितीचा ध्यास, तंत्रज्ञानाची आवड, मार्केटिंगमधील कौशल्य, सतत शिखरावर राहण्याची जिद्द या गुणांमुळे स्टीव्ह जॉब्स हा जागतिक कीर्तीचा तंत्रज्ञ ठरला. त्याचा प्रतिस्पर्धी मायक्रोसॉफ्ट कंपनीचा मालक बिल गेटदेखील त्याच्या या गुणांची कदर करायचा. बिल गेटने तर त्याला आधुनिक युगाचा एडिसन अशी पदवी दिली. ५ ऑक्टोबर २०११ रोजी वयाच्या अवघ्या ५६ व्या वर्षी तंत्रज्ञानाच्या या बादशहाने जगाचा निरोप घेतला. तंत्रज्ञानाच्या या बादशहाला स्मृतिदिनी विनम्र अभिवादन!

**– श्याम ठाणेदार**

# दुष्काळ – एक आवाहन !!

**आभाळाकडे पाहत शेतकरी आजही एकच प्रश्न विचारतोय...**

आता तरी पाऊस येईल का?

पण आभाळाने पाठ फिरवली आहे.

शिवारातील पिके करपली आहेत.

जमिनीला भेगा पडल्या आहेत.

विहिरींच्या तळाला पाणी दिसेनासे झाले आहे.

ओढे-नाले कोरडे पडले आहेत.

आणि शेतकऱ्याच्या डोळ्यांत मात्र पाण्याचे थेंब उरले आहेत...

हे चित्र एखाद्या जुन्या दुष्काळाचे नाही.

हे आजच्या महाराष्ट्राचे वास्तव आहे.

२०२६ च्या खरीप हंगामात पावसाने दिलेल्या दीर्घ ओढीमुळे राज्यातील अनेक भागांत दुष्काळी परिस्थिती निर्माण झाली. २५ सप्टेंबर रोजी शासनाने 'ट्रिगर-१' लागू झालेल्या २६५ तालुक्यांमध्ये दुष्काळ जाहीर करून विविध उपाययोजना आणि सवलती लागू करण्याचा निर्णय घेतला. त्यानंतर पीक नुकसानीचे पंचनामे करण्याचे आदेश देण्यात आले.

आता पंचनामे सुरू आहेत.

पण या पंचनाम्यांच्या कागदावर फक्त आकडे नकोत...

त्या आकड्यांमागचा शेतकऱ्याचा संसार दिसला पाहिजे!

पंचनाम्याच्या कागदावर करपलेले पीक दिसेल; पण शेतकऱ्याची व्यथा दिसेल का?

आज अधिकारी शेताच्या बांधावर जातील.

**किती क्षेत्र बाधित?**

**किती टक्के नुकसान?**

**कोणते पीक?**

**किती क्षेत्र करपले?**

**याची नोंद होईल.**

पिकांची छायाचित्रे घेतली जातील. ऋझड नोंदी केल्या जातील. गावनिहाय आणि तालुकानिहाय अहवाल तयार होतील. ही प्रक्रिया अधिक वस्तुनिष्ठ करण्याचा प्रयत्न आहे.

पण एका पंचनाम्यात शेतकऱ्याचे वर्षभराचे श्रम मोजता येतील का?

एका कागदावर त्याच्या कर्जाचा भार उतरवता येईल का?

त्याच्या मुलांच्या शिक्षणाची चिंता, घरखर्चाची जबाबदारी, जनावरांचा चारा आणि पुढच्या हंगामासाठी लागणारे भांडवलयांची नोंद त्या पंचनाम्यात होईल का?

दुष्काळाचे पंचनामे शेताच्या बांधावर झाले पाहिजेत; पण दुष्काळाचे खरे मोजमाप शेतकऱ्याच्या आयुष्यावर झाले पाहिजे.

ही केवळ पावसाची चूक नाही!

दुष्काळ म्हटला की पहिला प्रश्न पडतोपाऊस किती झाला?

पण त्यापुढचा प्रश्न अधिक महत्त्वाचा आहे

पडलेल्या पावसातील किती पाणी आपण अडवले?

पावसाचे पाणी डोंगरावरून वेगाने खाली येते. ओढ्यांतून वाहते. नदीत जाते आणि शेवटी समुद्राला मिळते.

उन्हाळा आला की आपण त्याच पाण्यासाठी टँकर शोधतो.

म्हणजे समस्या केवळ पावसाची नाही.

समस्या पावसाच्या पाण्याच्या व्यवस्थापनाचीही आहे.

सरकारच्या योजना आहेत; आता त्यांचा परिणाम शिवारात दिसला पाहिजे

दुष्काळावर मात करण्यासाठी केंद्र आणि राज्य सरकारांनी जलसंधारण, पाणलोट विकास, सिंचन विस्तार आणि सूक्ष्म सिंचनासाठी विविध योजना राबवल्या आहेत.

जलयुक्त शिवार अभियान, जलयुक्त शिवार अभियान २.०, मुख्यमंत्री जलसंवर्धन योजना, प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना आणि सूक्ष्म सिंचनाच्या योजना या माध्यमातून पाणी अडवणे, पाणी जिरवणे, जलसाठे पुनरुज्जीवित करणे आणि उपलब्ध पाण्याचा कार्यक्षम वापर करण्याचा प्रयत्न केला जात आहे.

जलयुक्त शिवार २.० मध्ये मृद व जलसंधारण, पाणलोट विकास, जलसाक्षरता आणि भूजलाच्या शाश्वत वापरावर भर देण्यात आला आहे. मुख्यमंत्री जलसंवर्धन योजनेत अस्तित्वातील जलस्त्रोतांची दुरुस्ती आणि सिंचन क्षमता पुनर्स्थापित करण्याचा उद्देश आहे.

प्रधानमंत्री कृषी सिंचन योजनेतही सिंचनाखालील क्षेत्र वाढविण्याबरोबरच पाण्याच्या कार्यक्षम वापरावर भर आहे.

योजना अनेक आहेत; आता गरज आहे ती त्यांची गावागावातील परिणामकारक सांगड घालण्याची.

'पाणी अडवा, पाणी जिरवा' ही घोषणा न राहता गावाचा संकल्प व्हावा

दुष्काळ जाहीर झाल्यानंतर मदत मिळणे आवश्यक आहे.

पीक नुकसानभरपाई मिळाली पाहिजे.

कर्जाला दिलासा मिळाला पाहिजे.

चारा आणि पिण्याच्या पाण्याची व्यवस्था झाली पाहिजे.

पण हे सारे तात्पुरते उपाय आहेत.

खरा प्रश्न पुढच्या वर्षी पुन्हा उभा राहणार आहे.

म्हणून आजपासूनच प्रत्येक गावाने विचार केला पाहिजे

पुढील पावसाळ्यात किती पाणी अडवणार?

किती पाणी जमिनीत मुरवणार?

गावातील किती तलाव गाळमुक्त करणार?

किती बंधारे सक्षम करणार?

किती विहिरींचे पुनर्भरण करणार?

किती शेतांमध्ये ठिबक किंवा तुषार सिंचन आणणार?

उपलब्ध पाण्यानुसार कोणती पीकपद्धती स्वीकारणार? दुष्काळ जाहीर होण्याची वाट पाहून जलसंधारण सुरू करण्याची वेळ आता संपली आहे.

पिकांची निवडही पाण्याच्या उपलब्धतेनुसार हवी

पाणी कमी असताना पाण्याची मोठी गरज असलेली पिके मोठ्या प्रमाणावर घेण्याचा प्रश्नही आता गंभीरपणे विचारात घ्यावा लागेल.

शेतकऱ्याला केवळ हे पीक घ्या असे सांगून चालणार नाही. त्याला

**पाणी + बाजारभाव + उत्पादन खर्च + हवामान + उपलब्ध तंत्रज्ञान + विमा + प्रक्रिया उद्योग**

या सर्वांचा विचार करून पीक नियोजनाची माहिती मिळाली पाहिजे.

'प्रति थेंब अधिक पीक' ही संकल्पना प्रत्यक्षात आणण्यासाठी ठिबक आणि तुषार सिंचनासारख्या सूक्ष्म सिंचन पद्धतींचा विस्तार महत्त्वाचा आहे.

पंचनामा हा शेवट नसून मदतीची सुरुवात असावी

आज शेतकरी पंचनाम्याकडे मोठ्या आशेने पाहत आहे.

कारण त्याला माहिती आहे. पंचनामा म्हणजे पुढील मदतीचा आधार.

त्यामुळे पंचनामे करताना एकही बाधित क्षेत्र सुटू नये, प्रत्यक्ष स्थिती अचूक नोंदवली जावी आणि प्रशासनाने शेतकऱ्यांशी संवेदनशीलतेने संवाद साधावा, ही अपेक्षा आहे.

पंचनाम्याची प्रक्रिया वस्तुनिष्ठ करण्यासाठी पिकांची छायाचित्रे आणि ऋझड नोंदी घेण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. पण त्याचबरोबर एक प्रश्नही महत्त्वाचा आहे

पंचनाम्यानंतर मदत शेतकऱ्याच्या खात्यापर्यंत किती वेगाने पोहोचते?

कारण संकटात सापडलेल्या माणसासाठी मदतीची वेळही मदतीइतकीच महत्त्वाची असते.

आजची मदत आणि उद्याची शाश्वतता

दुष्काळात तातडीची मदत आवश्यक आहे.

पण प्रत्येक दुष्काळानंतर फक्त नुकसानभरपाई देत राहिलो आणि जलसंधारणाची कायमस्वरूपी व्यवस्था उभी केली नाही, तर पुढचा दुष्काळ पुन्हा त्याच प्रश्नांसह उभा राहील.

म्हणून दोन पातळ्यांवर काम झाले पाहिजे.

**आजसाठी...** पंचनामे फ नुकसानभरपाई फ कर्जसवलत/पुनर्रचना फ चारा फ पिण्याचे पाणी फ वीज व इतर आवश्यक सवलती.

**उद्यासाठी...** जलसंधारण फ पाणलोट विकास फ भूजल पुनर्भरण फ शेततळी फ तलावांचे पुनरुज्जीवन फ सूक्ष्म सिंचन फ पीक नियोजन फ जलसाक्षरता. ही दोन्ही चाके एकाच वेळी फिरली तरच दुष्काळमुक्तीची वाट तयार होईल. आता 'गावाचा जलहिशेब' झाला पाहिजे

प्रत्येक गावाने दरवर्षी आपला जलहिशेब मांडला पाहिजे.

**गावात किती पाऊस पडला?**

**किती पाणी साठले?**

**किती पाणी जमिनीत मुरले?**

**किती भूजल उपसले?**

**किती शेतीला पाणी लागले?**

**किती पाणी पिण्यासाठी लागले?**

**आणि पुढच्या उन्हाळ्यापर्यंत किती पाणी उपलब्ध राहणार?**

ज्याप्रमाणे ग्रामपंचायत आर्थिक अंदाजपत्रक तयार करते, त्याचप्रमाणे गावाचे वार्षिक जल अंदाजपत्रक तयार करण्याची वेळ आली आहे.

दुष्काळमुक्तीची खरी जबाबदारी कोणाची?

सरकारचीनक्कीच.

प्रशासनाचीनिश्चितच.

पण केवळ सरकारची नाही.

ग्रामपंचायत, शेतकरी, सहकारी संस्था, स्वयंसेवी संस्था, उद्योग, जलतज्ज्ञ, कृषी विद्यापीठे आणि गावातील तरुणसगळ्यांनी एकत्र येणे आवश्यक आहे.

सरकार योजना देईल; गावाने तिचे रूपांतर जलसंपत्तीत केले पाहिजे.

सरकार बंधारा बांधेल; गावाने तो जपला पाहिजे.

सरकार तलाव दुरुस्त करेल; गावाने त्यात कचरा जाऊ दिला नाही पाहिजे.

सरकार सूक्ष्म सिंचनासाठी मदत करेल; शेतकऱ्याने त्याचा कार्यक्षम वापर केला पाहिजे.

तेव्हाच योजना कागदावरून शिवारात उतरतील.

आज करपलेले शिवार उद्या हिरवे होऊ शकते!

दुष्काळ हा अंत नाही.

तो इशारा आहे.

निसर्गाचा इशारा...

व्यवस्थेचा इशारा...

आणि आपल्या जलवापराच्या पद्धतीचा इशारा...

आज शेतातील पीक करपले आहे.

पण उद्या त्याच शेतात हिरवे पीक उभे राहू शकतेजर आज आपण पाण्याचे नियोजन केले तर.

आज विहीर कोरडी आहे. पण उद्या तिच्यात पाणी असू शकतेजर आज पावसाचे पाणी जमिनीत मुरवले तर.

आज शेतकरी चिंतेत आहे.

पण उद्या त्याच्या चेहऱ्यावर समाधान असू शकतेजर शेतीला शाश्वत जलसुरक्षा मिळाली तर.

**एक शेवटचे आवाहन...**

पंचनामे करापण त्यानंतर मदतही वेळेत द्या.

दुष्काळ जाहीर करापण दुष्काळमुक्तीचा आराखडाही तयार करा.

योजना जाहीर करापण त्यांचा परिणाम शेताच्या बांधावर दिसू द्या.

निधी खर्च करापण प्रत्येक रुपयाचा जलहिशेब ठेवा.

आणि सर्वांत महत्त्वाचे

पाऊस येण्याची वाट पाहू नका;

पाऊस आला की तो वाहून जाऊ नये, याची आजच तयारी करा.

कारण... दुष्काळाची खरी लढाई पाऊस थांबल्यानंतर सुरू होत नाही; ती पाऊस पडण्यापूर्वीच सुरू झाली पाहिजे.

आज करपलेल्या शिवाराकडे पाहून आपण केवळ हळहळ व्यक्त करायची की या संकटातून शाश्वत मार्ग काढायचाहा निर्णय आजच्या समाजासमोर आहे.

दुष्काळाची कथा दरवर्षी नव्याने लिहिण्याऐवजी,

दुष्काळमुक्त महाराष्ट्राची नवी कथा लिहिण्याची हीच वेळ आहे.

**पाणी अडवूया...**

**पाणी जिरवूया...**

**पाणी जपून वापरूया...**

आणि पुढच्या पिढीसाठी जलसमृद्ध महाराष्ट्र घडवूया!

**– पत्रकार विकास दळवी**
**दै.अक्षराज ठाणे प्रतिनिधी**

## पक्ष प्रथा

पक्ष पंधरवडा शुभ
जाणून घ्यावी प्रथा
धर्मांमागे असेशास्त्र
समजूनि घेई कथा

श्रद्धाभाव होविश्वासे
पाखांडियाहि आस्था
समाधान प्राप्त चित्ता
शांतता ती अस्वस्था

स्नान संध्या उपचारा
निश्चित तन स्वस्थता
यथा विधी कार्य पूर्ण
साधताना मनतृप्तता

पितरांच्या आशिर्वादे
कुलोध्दारार्थ संहिता
नाव जरी रे पितरांचे
करी सारेआपलेहिता

व्यवसाय ज्या त्याचा
रोजगार द्या पुरोहिता
दक्षिणा घेई हक्काची
लपवेआपणअंतर्हिता

रिकामे राहीलं व्यर्थ
घडा ठेवला पालथा
बोथट का बुध्दीमत्ता
विचार कलश उमथा

**– हेमंत मुसरीफ, पुणे**
**९७३०३०६९९६**

अक्षराज
अचूक वेध, अचूक बातमी

# अशाने भारत स्वच्छ होईल का ?

नुकतीच गांधी जयंती देशभरात साजरी झाली. त्यानिमित्त विविध राजकीय पक्ष, संस्था आणि संघटना यांच्या वतीने ठिकठिकाणी स्वच्छता अभियान राबवण्यात आले. या अभियानात नेतेमंडळींसह, उद्योगपती, सेलिब्रिटी यांनी सहभाग घेतल्याच्या बातम्या वृत्तवाहिन्या आणि वृत्तपत्रांत झळकल्या.

यानिमित्ताने या मंडळींचे हातात झाडू घेतलेले फोटो प्रसिद्धी माध्यमांसह समाज माध्यमांतून प्रसारित झाले. हे फोटो पाहताना सदर मंडळी खरोखर स्वच्छता करत आहेत कि हातात झाडू घेऊन स्वच्छतेचा केवळ देखावा करत आहेत असा प्रश्न पडला. एकाच ठिकाणी घोळका करून मोठमोठे झाडू रस्त्यावरून फिरवून खरंच स्वच्छता होणार आहे का ? काही ठिकाणी तर झाडूखाली केर दिसावा म्हणून अन्य ठिकाणाहून केर आणून रस्त्यावर पसरवल्याचेही लक्षात आले.

अशा नौटंकीने खरोखर भारत स्वच्छ होणार आहे का ? सकाळी लवकर येऊन रस्त्यावरील कचरा झाडून रस्ते चकाचक करणारे, रस्त्यावरील केराचे डबे रिते करणारे पालिका कर्मचारी, सार्वजनिक परिसर स्वच्छ ठेवण्यासाठी वर्षाचे बाराही महिने झटणाऱ्या स्वयंसेवी संघटना हे खरे स्वच्छता दूत असून यांची छायाचित्रे कधीच प्रसारमाध्यमांतून झळकत नाहीत. त्यामुळे स्वच्छ



भारत अभियान केवळ हातात झाडू घेऊन फोटो काढण्याइतके सीमित न राहता त्याची सर्वच स्तरांवर व्यापक प्रमाणात जागृती होणे गरजेचे आहे. स्वच्छतेचे महत्व कोरोना काळात सर्वांच्याच लक्षात आले होते; मात्र त्याचे पुन्हा विस्मरण झाल्याचे दिसून येत आहे. हवाबंद खाद्य पदार्थांचे रिकामे पॅकेट्स, फळांची साले, कागदांची कसपटे, चहा, सरबतांचे वापरलेले ग्लासेस ट्रेन आणि बसमध्ये सर्रासपणे दिसून येतात.

कचरा कुंडीत टाकायचा कचरा रस्त्यावर, रेल्वेच्या पटरिवर टाकताना लोकांना काहीच वाटत नाही. पान, तंबाखू आणि गुटखा खाऊन सार्वजनिक ठिकाणी, रस्त्यालगतच्या भिंती रंगवताना त्याचा इतरांना त्रास होणार आहे याचे काहीच सोयरसुतक या मंडळींना नसते. स्वच्छतेचे महत्व पुन्हा एकदा कठोरपणे पटवून देण्याची आणि अस्वच्छता करणाऱ्या महाभागांना दंडित करण्याची नितांत गरज असून त्याशिवाय समाज स्वच्छ होणार नाही.

**– सौ. मोक्षदा घाणेकर,**
**काळाचौकी, मुंबई**

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# रुग्णालयातून परतल्यानंतर कौटुंबिक वाद पेटला

## सासूच्या घराला आग लावण्याचा प्रयत्न; पत्नी, मुलांसह सासूने घेतला सुरक्षितस्थळी आश्रय

**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि.०४, नागपूर :** चनकापूर येथील जयभोले नगरात शनिवारी पहाटे सकाळच्या सुमारास कौटुंबिक कलहातून एका सैनिकाने सासूचे घर पेटवून देण्याचा प्रयत्न केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. या घटनेमुळे परिसरात तीव्र खळबळ उडाली असून, भीतीपोटी पीडित महिला, तिची तीन लहान मुले आणि पिडिताच्या वृद्ध आईने नातेवाइकांकडे धाव घेत स्वतः चा बचाव केला.

प्राप्त माहितीनुसार, पुणे येथील बिहार बटालियनमध्ये कार्यरत असलेला सैनिक किशन साबू उईके (वय ३२) हा एका दिवसाच्या सुट्ट्यावर घरी आला होता. ०१ ऑक्टोबर रोजी त्याचे पत्नीसोबत संशयाचा सुईतून जोरदार भांडण झाले. या वादानंतर किशनने विष प्राशन केले, त्यानंतर त्याला आधी चिचोली प्राथमिक आरोग्य केंद्रात आणि नंतर नागपूरच्या शासकीय रुग्णालयात उपचारासाठी हलवण्यात आले होते.

उपचारानंतर रुग्णालयातून सुटी मिळून घरी परतताच त्यांच्यात पुन्हा वाद पेटला. याप्रकरणी पत्नीने खापरखेडा पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली. ठाण्यातही दोघांमध्ये खडाजंगी झाली. पतीने केलेल्या मारहाणीचा आरोप करत पतीने विष प्राशन करण्याचा प्रकार निव्वळ बनाव असल्याचा संशय व्यक्त केला, तर दोघांमधील परस्पर अविश्वासामुळे हा वाद विकोपाला गेल्याचे बोलले जात आहे. शनिवारी पहाटे सकाळच्या सुमारास संतापलेल्या पतीने सासूच्या घरातील मुलांचे कपडे व इतर घरगुती साहित्य पेटवून दिले, ज्यामध्ये मोठे आर्थिक नुकसान झाले. आगीचे लोट दिसताच पत्नीने तत्काळ आपातकालीन ११२ क्रमांकावर फोन करून पोलिसांना घटनेची माहिती दिली. माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी पोहोचून पाहणी केली.

कौटुंबिक सुरक्षेचा प्रश्न गंभीर बनल्याने या प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषींवर कडक कारवाई करण्याची मागणी नागरिकांकडून केली जात आहे.

# पनवेल तालुक्यातील सुखापुमध्ये दीड लाखांचे सोन्याचे दागिने चोरीला

## नातेवाईकांच्या कार्यक्रमाला जाण्यापूर्वी बॅग उघडताच प्रकार उघडकीस

**अक्षराज : अभिनव येलवे**

**दि.०४ : पनवेल (रायगड) :** सुखापूर येथील प्रयाग आंगण सोसायटीमध्ये राहणाऱ्या शिर्के कुटुंबाच्या घरातून सुमारे दीड लाख रुपये किमतीचे सोन्याचे दागिने चोरीला गेल्याची घटना समोर आली आहे. नातेवाईकाच्या कार्यक्रमाला जाण्यासाठी घरातील व्यक्ती बॅग उघडत असताना दागिने गायब असल्याचे लक्षात आले.




अचानक दागिने चोरीला गेल्याचे समोर आल्याने कुटुंबीयांना मोठा धक्का बसला. प्रयाग आंगण सोसायटीमध्ये शिर्के कुटुंब मागील सुमारे तीन वर्षांपासून भाडेतत्त्वावर राहत आहे. कुटुंबात पती, पत्नी आणि त्यांचा मुलगा असे तीन सदस्य आहेत. घरातील सोन्याचे हातातील ब्रेसलेट तसेच कानातील झुमके, अशी सुमारे दीड लाख रुपये किमतीची दागिने चोरीला गेल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, शिर्के कुटुंबातील सदस्य नातेवाईकाच्या कार्यक्रमाला जाण्याच्या तयारीत होते. त्यासाठी बॅग उघडली असता त्यामध्ये ठेवलेले सोन्याचे दागिने आढळून आले नाहीत. दागिने नेमके कधी आणि कोणत्या परिस्थितीत चोरीला गेले, याबाबत कुटुंबीयांना माहिती नसल्याने त्यांनी या घटनेची तक्रार खांदेश्वर पोलीस ठाण्यात दाखल केली आहे.

तक्रार प्राप्त झाल्यानंतर पोलिसांनी घटनेची नोंद करून तपास सुरू केला आहे. चोरी घरातून नेमकी कशी झाली, या कालावधीत घरात किंवा परिसरात कोणाची ये-जा होती, तसेच सोसायटीतील सीसीटीव्ही कॅमेऱ्यांच्या माध्यमातून संशयित व्यक्तींचा शोध घेण्याचे काम पोलिसांकडून सुरू असल्याचे समजते. चोरीच्या घटनेमागे नेमका कोणाचा हात आहे, हे तपासाअंती स्पष्ट होणार आहे. दरम्यान, पनवेल तालुक्यात चोरीच्या घटनांमध्ये वाढ होत असल्याने नागरिकांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. घराबाहेर जाताना मौल्यवान वस्तू सुरक्षित ठिकाणी ठेवाव्यात, घराची सुरक्षा व्यवस्था तपासावी तसेच संशयास्पद व्यक्ती अथवा हालचाली आढळल्यास तत्काळ पोलिसांना माहिती द्यावी, असे आवाहन पोलिसांकडून करण्यात आले आहे.

# मेघना दीदी यांच्या मार्गदर्शनाखाली चारठाणा येथे मोतीबिंदू पूर्वतपासणी आरोग्य शिबिर संपन्न

अक्षराज : अलीम शेख

दि.०४, परभणी : "NCCD-TB-Cataract मुक्त परभणी' अभियानांतर्गत दिनांक ०३ ऑक्टोबर २०२६ रोजी चारठाणा येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात मोतीबिंदू पूर्व तपासणी आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले.

राज्यमंत्री तथा परभणी जिल्ह्याच्या पालकमंत्री मेघना साकोरे बोर्डीकर यांच्या मार्गदर्शनाखाली, जिल्हा परिषद परभणीचे मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा आरोग्य अधिकारी व जिल्हा शल्यचिकित्सक यांच्या मार्गदर्शनाखाली हे शिबिर संपन्न झाले.

या शिबिराचे उद्घाटन गोविंदभाऊ थिटे, नानासाहेब राऊत, शिवाजीराव कदम, पंचायत समिती सदस्य तहेसीन देशमुख आणि तालुका आरोग्य अधिकारी डॉ.बाबासाहेब जाधव यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. सकाळी १० वाजता प्राथमिक आरोग्य केंद्र चारठाणा येथे शिबिराला सुरुवात झाली. या शिबिरामध्ये मोतीबिंदूचा संशय असलेल्या एकूण १३८ रुग्णांची पूर्व तपासणी करण्यात आली. त्यापैकी ३८ रुग्ण मोतीबिंदू शस्त्रक्रियेसाठी पात्र आढळून आले. त्यामुळे परिसरातील गरजू रुग्णांना वेळेत निदान व पुढील उपचारांची संधी उपलब्ध झाली आहे. या शिबिरामुळे ग्रामीण भागातील नागरिकांना मोतीबिंदूच्या आजाराबाबत जागरूकता निर्माण होण्यास मदत झाली. अनेकदा आर्थिक अडचणी, आरोग्यविषयक माहितीचा अभाव आणि दवाखान्यापर्यंत पोहोचण्यातील अडचणींमुळे नागरिक डोळ्यांच्या आजारांकडे दुर्लक्ष करतात. अशा परिस्थितीत आरोग्य विभागाच्या वतीने आयोजित करण्यात आलेली ही शिबिरे नागरिकांसाठी महत्त्वपूर्ण ठरत आहेत.

यावेळी डॉ. राजकुमार पोकर्णा, वाजेद कुरेशी, भाऊराव भवरे, शिवशंकर तमशेटे, विशाल निकाळजे, श्रीपाद देशपांडे, साबेर पठाण, बाबासाहेब हेंद्रे, संदीप देशमुख, पूनमताई तमशेटे, तुषार तोडकर, रामराव देशमुख, अमोल भवरे, आनंद निकाळजे, तलाठी प्रवीण बुरकुल, अन्वर पठाण आणि चिंतामण दौंड यांच्यासह आरोग्य विभागातील अधिकारी व कर्मचारी मोठ्या




संख्येने उपस्थित होते.

शिबिर यशस्वी करण्यासाठी तालुका आरोग्य अधिकारी डॉ. आबासाहेब जाधव, नेत्ररोग तंत्रज्ञ डॉ. काळे (परभणी), तालुका आरोग्य सहाय्यक राठोड, तालुका कार्यक्रम सहाय्यक दत्तात्रय कौटकर, ढगे, मीरा देशमुख तसेच प्राथमिक आरोग्य केंद्र चारठाणाचे वैद्यकीय अधिकारी डॉ. विश्वनाथ गळाकाटू यांनी विशेष परिश्रम घेतले. याशिवाय आरोग्य सहाय्यक, आरोग्य सहाय्यिका, आरोग्य सेवक, आरोग्य सेविका, गटप्रवर्तक, आशा स्वयंसेविका आणि तालुका आरोग्य कार्यालयातील कर्मचाऱ्यांनी शिबिराच्या यशस्वितेसाठी मोलाचे सहकार्य केले.

नागरिकांना दर्जेदार आरोग्यसेवा उपलब्ध करून देणे, आजारांचे वेळेत निदान करणे आणि गरजू रुग्णांना पुढील उपचारांसाठी मार्गदर्शन करणे हा या अभियानाचा प्रमुख उद्देश आहे. मोतीबिंदूमुळे दृष्टीसंबंधी समस्या निर्माण होण्यापूर्वीच तपासणी करून आवश्यक उपचार मिळावेत, यासाठी आरोग्य विभागाच्या वतीने विशेष प्रयत्न केले जात आहेत. मेघना दीदी साकोरे बोर्डीकर यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात येणाऱ्या या आरोग्य अभियानामुळे ग्रामीण भागातील नागरिकांना आरोग्यसेवेचा लाभ मिळत असून, चारठाणा येथील या शिबिरातून ३८ रुग्ण शस्त्रक्रियेसाठी पात्र ठरणे ही महत्त्वपूर्ण बाब ठरली आहे.

नागरिकांनीही डोळ्यांच्या आरोग्याबाबत जागरूक राहून नियमित तपासणी करून घ्यावी, असे आवाहन आरोग्य विभागाच्या वतीने करण्यात आले.

# शिवसेना (उबाठा) जिल्हाप्रमुख भास्कर ताजने यांचा वाढदिवस साजरा

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.०४, भद्रावती (चंद्रपूर) :** शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे निष्ठावान नेते तथा चंद्रपूर जिल्ह्याचे जिल्हा प्रमुख भास्कर ताजने यांचा वाढदिवस दिनांक ०१ ऑक्टोबर रोजी भद्रावती येथील वृंदावन सभागृहात अत्यंत उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. यानिमित्ताने चंद्रपूर जिल्ह्यातील विविध भागांतून आलेल्या पदाधिकारी, शिवसैनिक, कार्यकर्ते, हितचिंतक आणि नागरिकांनी भास्कर ताजने यांना वाढदिवसानिमित्त मनःपूर्वक शुभेच्छा देत त्यांच्या सामाजिक व राजकीय कार्याचा गौरव केला.

**सर्वसामान्यांच्या प्रश्नांसाठी सदैव तत्पर नेतृत्व**

भास्करताजने यांनी आपल्या प्रदीर्घ राजकीय व सामाजिक वाटचालीत शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे संघटन चंद्रपूर जिल्ह्यात मजबूत करण्यासाठी सातत्याने योगदान दिले आहे. सर्वसामान्य नागरिक, शेतकरी, कामगार तसेच शिवसैनिक आणि कार्यकर्त्यांच्या अडीअडचणींमध्ये त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहण्याची त्यांची भूमिका राहिली आहे.



**निष्ठावान नेतृतवाचा गौरव**

जनसामान्यांशी असलेला थेट संपर्क, कार्यकर्त्यांशी असलेली आपुलकी आणि संघटनात्मक बांधणीवर दिलेला भर यामुळे भास्कर ताजने यांची जिल्ह्यात एक सक्रिय आणि निष्ठावान नेतृत्व म्हणून ओळख निर्माण झाली आहे. वाढदिवसानिमित्त आयोजित कार्यक्रमाला चंद्रपूर जिल्ह्यातील विविध पदाधिकारी व मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती.

यामध्ये महेश केदारी चिमूर लोकसभा क्षेत्र, अजय स्वामी माजी जिल्हाप्रमुख, संजय ढवस राष्ट्रीय ओबीसी व्यापारी व उद्योजक महासंघाचे राष्ट्रीयअध्यक्ष, दत्ताबोरेकर, दिलीप कदम चिमूर-ब्रह्मपुरी विधानसभा संपर्क प्रमुख, अमित निब्रड उपजिल्हा प्रमुख, बंडू डाखरे विधानसभा प्रमुख, ज्ञानेश्वर डुकुरे माजी नगराध्यक्ष भद्रावती, नरेश काळे भद्रावती तालुका प्रमुख, विपीन काकडे वरोरा तालुका प्रमुख, बंटी हेमके भद्रावती शहर प्रमुख, अतुल नांदे वरोरा शहर प्रमुख, भावना खोब्रागडे महिला जिल्हा संघटिका, मायाताई नारडे महिला उपजिल्हाप्रमुख, विभा बेहरे महिला तालुका प्रमुख भद्रावती, बंडू चटपल्लीवार शहर संघटक, सचिन डुकरे तालुका संघटक, नरेंद्र गाडगीलवार ब्रह्मपुरी तालुका प्रमुख, मिलिंद भनारे, आशिष रणदिवे शिवसैनिक यांच्यासह मोठ्या संख्येने शिवसैनिक व कार्यकर्ते उपस्थित होते.उपस्थित मान्यवर आणि शिवसैनिकांनी भास्कर ताजने यांना वाढदिवसानिमित्त आदरयुक्त व मनःपूर्वक शुभेच्छा देत त्यांच्या भावी सामाजिक व राजकीय वाटचालीसाठी सदिच्छा व्यक्त केल्या. सर्वसामान्यांच्या प्रश्नांसाठीचा आपला संघर्ष, पक्षनिष्ठा आणि कार्यकर्त्यांसाठीची आपली बांधिलकी अशीच कायम राहो; आपल्या नेतृत्वाला अधिक बळ मिळो आणि सामाजिक व राजकीय वाटचाल यशस्वी होवो, अशा सदिच्छांनी भास्कर ताजने यांचा वाढदिवस उत्साहात साजरा करण्यात आला.

# थोडक्यात बातम्या

## चंद्रपूरच्या आरोग्य प्रश्नांना मंत्रालयात वाचा; आ.जोरगेवार यांची वैद्यकीय शिक्षणमंत्र्यांशी भेट

**अक्षराज : वसंत वडस्कर**



**दि.०४, चंद्रपूर :** चंद्रपूर मतदारसंघातील वैद्यकीय शिक्षण आणि आरोग्य क्षेत्राशी संबंधित विविध प्रश्न मार्गी लावण्यासाठी आमदार किशोर जोरगेवार यांनी मुंबई येथे राज्याचे वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुशीफ यांची भेट घेतली. यावेळी मतदारसंघातील नागरिकांच्या आरोग्याशी तसेच वैद्यकीय शिक्षणाशी निगडित विविध महत्त्वपूर्ण विषयांवर मंत्र्यांशी सविस्तर चर्चा करण्यात आली. संबंधित मागण्यांची निवेदनेही यावेळी सादर करण्यात आली असून, या विषयांवर आवश्यक ती कार्यवाही करून प्रश्न मार्गी लावण्यासाठी सहकार्य करण्याचे आश्वासन मंत्री हसन मुशीफ यांनी दिले.चंद्रपूर मतदारसंघात आरोग्य आणि वैद्यकीय शिक्षणाच्या सुविधा अधिक सक्षम करण्याची गरज असून, नागरिकांना दर्जेदार आणि सहज उपलब्ध वैद्यकीय सेवा मिळाव्यात, यासाठी आ.किशोर जोरगेवार सातत्याने विविध स्तरांवर पाठपुरावा करीत आहेत. याच अनुषंगाने मुंबई येथे वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुशीफ यांची भेट घेऊन मतदारसंघातील विविध प्रलंबित प्रश्न त्यांच्या निदर्शनास आणून देण्यात आले.

या भेटीत वैद्यकीय शिक्षणाशी संबंधित विविध बाबींसोबतच आरोग्य क्षेत्रातील नागरिकांच्या हिताच्या प्रश्नांवरही सविस्तर चर्चा झाली. चंद्रपूरच्या आरोग्य व्यवस्थेला अधिक सक्षम करण्यासाठी आवश्यक सुविधा, वैद्यकीय शिक्षणाशी संबंधित गरजा आणि नागरिकांना अधिक चांगल्या आरोग्यसेवा उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने आवश्यक उपाययोजनांबाबत आ.जोरगेवार यांनी आरोग्य मंत्री यांचे लक्ष वेधले. आ. किशोर जोरगेवार यांनी मांडलेल्या विविध विषयांची मंत्री हसन मुशीफ यांनी सकारात्मकतेने दखल घेतली. संबंधित विभागांकडून आवश्यक माहिती घेऊन या प्रश्नांचा पाठपुरावा करण्यात येईल तसेच ते निकाली काढण्यासाठी सहकार्य केले जाईल,असे आश्वासन त्यांनी दिले. चंद्रपूरच्या आरोग्य व वैद्यकीय शिक्षण क्षेत्राच्या विकासासाठी आ. जोरगेवार यांनी थेट राज्याच्या वैद्यकीय शिक्षण विभागाकडे पाठपुरावा केल्याने या प्रश्नांना आता शासनस्तरावर गती मिळण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.



## हा क्षण अनंताचा

आत्ताचा क्षण सुंदर करा...
कारण येथे
अनंता शिवाय
अनंत काहीच नाही.

जे निघून गेले,
ते काळाच्या आंजळीत विलीन होत गेले.
जे येणार आहे,
ते अजून नियतीच्या श्वासातही
जन्मलेले नाही.

मग उरले काय?

हा एक श्वास...
जो आत येतो,
आणि सांगून जातो
"तू जिवंत आहेस,
कारण तुझ्यात तो अनंत
अजूनही धडधडतो."

जग जिंकण्याच्या धावण्यात
माणूस स्वतःलाच हरवून बसतो.
आकाश मोजण्याच्या हट्टात
स्वतःच्या अंतःकरणाचा अथांग सागर
त्याच्या नजरेतून निसटून जातो.

क्षण कधीच साधा नसतो.
तो ईश्वराने लिहिलेली
एक मौन प्रार्थना असते.
ज्याला ऐकण्यासाठी
कान नव्हे,
तर शांत झालेले मन लागते.

फुल उमलताना आवाज करत नाही,
सूर्योदयाला घोषणांची गरज नसते,
नदी वाहताना
तिच्या प्रवाहाचा गर्व नसतो.
अनंतही असाच असतो
निःशब्द...
पण सर्वत्र.

स्वतःला इतके रिकामे करा,
की प्रत्येक श्वासात
त्याची चाहूल लागेल.
इतके नम्र व्हा,
की प्रत्येक भेटणाऱ्या जीवात
त्याचाच चेहरा दिसेल.

कारण प्रेम म्हणजे
दोन हृदयांचा नव्हे,
तर एका अनंताचा
स्वतःलाच दिलेला स्पर्श.

मृत्यूही शेवट नसतो.
तो फक्त
एका श्वासातून दुसऱ्या
शाश्वत शांततेत
उतरलेला प्रकाश असतो.

म्हणून...
या क्षणावर प्रेम करा.
यालाच कवटाळा.
यालाच नमस्कार करा.

कारण येथे
ना भूतकाळ आहे,
ना भविष्यकाळ...

येथे फक्त
अनंत आहे.
आणि त्या अनंतात
'मी' विलीन होतो,
'तू' विलीन होतोस,
उरते फक्त एक अखंड सत्य...

**आत्ताचा क्षण सुंदर करा...**
**कारण येथे अनंता शिवाय**
**अनंत काहीच नाही.**

• ॲड. कीर्तिराज शैलेंद्र आगलावे, पुणे ✦
मो:- 9011841212

## विहिरीत चक्क येऊ लागले पेट्रोल, सांगलीतील ही विहीर पुन्हा चर्चेत



**दि.०४, सांगली :** सांगली जिल्ह्यातील जत तालुक्यातील उमदी-पंढरपूर महामार्गालगत धुंडाप्पा माळी यांच्या शेतातील विहिरीतून पुन्हा एकदा मोठ्या प्रमाणात पेट्रोलसदृश्य पदार्थ बाहेर येत असल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. विहिरीतील पाण्यासोबत पेट्रोल वाहत असून, सुमारे एक लिटरच्या दहा बाटल्या भरून पेट्रोल बाहेर काढण्यात आल्याची माहिती शेतकऱ्यांनी दिली आहे.

सुमारे ५० फूट खोल असलेल्या या विहिरीत गेल्या महिनाभरापासून पेट्रोलसदृश्य पदार्थ येत असल्याचे सांगण्यात येत आहे. विशेष म्हणजे, गेल्या वर्षभरापासून विहिरीच्या परिसरात पेट्रोलसदृश्य वास येत होता. आता प्रत्यक्षात मोठ्या प्रमाणात पेट्रोल बाहेर येऊ लागल्याने परिसरातील नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. या प्रकारामुळे शेती पिकांचेही मोठे नुकसान झाल्याचे शेतकऱ्यांचे म्हणणे आहे.

**पेट्रोलची गळती होत असल्याचा स्थानिकांचा अंदाज**

या विहिरीपासून अवघ्या ३०० मीटर अंतरावर एचपी पेट्रोल पंप आहे. पेट्रोल पंपाच्या भूमिगत टाकीतून किंवा पाइपलाइनमधून पेट्रोलची गळती होऊन ते विहिरीत येत असावे, असा अंदाज नागरिक आणि शेतकऱ्यांकडून व्यक्त केला जात आहे. मात्र संबंधित कंपनीच्या पथकाने पेट्रोल पंपाची तपासणी करून पंपामध्ये गळती नसल्याचा अहवाल दिल्याचे सांगण्यात येते.

**विहिरीत पेट्रोल येण्याचे कारण काय?**

पेट्रोल पंप तपासणीसाठी बंद अथवा निरीक्षणाखाली ठेवण्यात आल्यानंतर विहिरीतील पेट्रोलचे प्रमाण कमी झाले होते. मात्र आता पुन्हा मोठ्या प्रमाणात पेट्रोल विहिरीत येऊ लागल्याने या प्रकरणाचे नेमके कारण काय? असा सवाल उपस्थित होत आहे.